लोकसत्ता पू. पान क्र. १ दि. 13/04/2023

## आरोपी खासगी बसमधून न्यायालयात



**वसई :** अर्नाळा सागरी पोलिसांनी बोगस कॉल सेंटरच्या आरोपींना न्यायालयात नेण्यासाठी खासगी बसचा वापर केल्याचे उघड झाले आहे.

अर्नाळा सागरी पोलिसांनी नुकतीच एका बोगस कॉलसेंटरवर कारवाई करून ४९ जणांना अटक केली आहे. सध्या आरोपी पोलीस कोठडीत असून तपास सुरू आहे. आरोपींना न्यायालयात ने-आण करण्यासाठी पोलिसांनी वादग्रस्त रिसॉर्ट चालकाच्या बसचा वापर केला आहे. राजोडी येथील क्षितिज रिसॉर्ट कॅफेचा मालक एका राजकीय पक्षाचा पदाधिकारी असून त्याच्या कॅफेतून बेकायदा मद्य विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल होता. तसेच काही दिवसांपूर्वी ग्राहकांना मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होता. अशा वादग्रस्ताची बस घेणे कितपत योग्य होते असा सवाल उपस्थित झाला आहे. पालिकेची परिवहन सेवेची बस किंवा एसटी उपलब्ध असताना खासगी बसचा वापर केल्याने अर्नाळा पोलीस वादात सापडले आहेत.

# सोनसाखळी चोरीच्या इराणी टोळीचा म्होरक्या गजाआड

### १०० गुन्हे दाखल असणारा आरोपी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरारमध्ये सोनसाखळी चोरी करणाऱ्या कुख्यात इराणी टोळीतील अब्बास इराणी याला गुन्हे शाखा २ च्या पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून सोनसाखळी चोरीचे २८ गुन्हे उघडकीस आले आहेत. मोक्काचे दोन गुन्हे दाखल असलेल्या अब्बास याच्यावर १०० हून अधिक सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांची नोंद आहे.

वसई, विरार शहरात सोंनसाखळी चोरी करणारी टोळी सक्रिय झाली होती. तीन महिन्यांतच सोनसाखळी चोरीच्या सात घटना घडल्या होत्या. यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती.

पोलिसांनी सीसीटीव्हीचा माग काढून तपास केला असता कल्याण येथील आंबिवली गावातील कुख्यात इराणी टोळी असल्याचे निष्पन्न झाले. या टोळीचा म्होरक्या अब्बास इराणी याला पकडण्यासाठी पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, साहाय्यक पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांनी गुन्हे शाखा २ च्या पथकाच्या मदतीने एक योजना बनवली होती.

#### दोन मोक्का, १०० गुन्हे

अब्बास इराणी हा इराणी टोळीचा कुख्यात चोर असून त्याच्यावर दिल्ली येथे १०० हून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. वसई, विरारमधील सात तसेच मुंबई आणि ठाणे परिसरातील सोनसाखळी चोरीचे २१ गुन्हे उघडकीस आले आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे यांनी दिली.

२०१६ मध्ये त्याच्यावर मोक्का लागला होता. तेव्हा तो अल्पवयीन असल्याने तुरुंगातून जामिनावर सुटला. २०१८ मध्ये पुन्हा त्याच्यावर मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. मात्र तो फरार होता, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी राणावरे यांनी दिली.

### सात वेळा वेशांतर करून सापळे

आंबिवली येथील इराणी पाडा येथून आरोपीला पकडणे कठीण असते. अनेकदा पोलिसांवर हल्ले होतात. शिवाय संपूर्ण परिसरातील लोक बचावासाठी येत असल्याने आरोपी निसटून जात होते. गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी रणावरे, सुहास कांबळे यांच्यासही १५ जणांच्या पथकाने वेशांतर करून सापळे रचले होते. मात्र सहा वेळा लावलेले सापळे फसले होते. मग पोलिसांनी फेरीवाला, रिक्षावाला बनून सापळा लावून अब्बास इराणी याला अटक केली. त्याच्याकडून वसई, विरारमधील सर्वच्या सर्व सात सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून त्याच्याकडून साडेतीन लाखांचे ८७ ग्रॅम चोरलेले सोने जप्त करण्यात आले आहे.

### भरोसा कक्षाच्या तेजश्री शिंदे यांचा गौरव

# महिला पोलीस अधिकाऱ्याला सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** बागेश्वर बाबाच्या प्रवचनातील महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी, मतिमंद मुलीवरील बलात्कारातील आरोपीची अटक, १६ वर्षांपूर्वीच्या हत्येचा तपास आदींना पोलीस आयुक्तांतर्फे मार्च महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. यंदा प्रथमच महिला अधिकाऱ्याचा सन्मान झाला असून भरोसा कक्षाच्या तेजश्री शिंदे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

म्यानमार देशात फसवणूक करून डांबून ठेवलेल्या तरुणाची भरोसा कक्षाने भारतीय दूतावासाच्या मदतीने सुटका केली होती. त्याबद्दल भरोसा कक्षाच्या प्रमुख साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे यांना मार्च महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल आयुक्तांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौविण्यात आले.

### गुन्हे शाखेची सर्वोत्कृष्ट कामगिरी

गुन्हे शाखा २ च्या पथकाने सायकली चोरणाऱ्या टोळीला अटक करून १७ गुन्ह्यांची उकल केली होती. गुन्हे शाखा ३ च्या पथकाने २००७ मध्ये झालेल्या विनोद झा याच्या हत्येचा तपास करून १६ वर्षे फरार असलेल्या तीन आरोपींना अटक केली होती. याबद्दल गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी रणावरे तसेच गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांचा सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. बागेश्वर धाम बाबा यांच्या मीरा रोड येथील प्रवचनात १७ महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला गुन्हे शाखा १ आणि नवघर पोलिसांनी अटक केली होती. त्याबद्दल गुन्हे शाखा १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे आणि नवघरचे विजयसिंह बागल यांना पुरस्कार देण्यात आला.

### पोलिसांचा सन्मान

विरारमध्ये अल्पवयीन मतिमंद मुलीवरील बलात्कार प्रकरणात विरार पोलिसांनी संवाद कौशल्याच्या आधारे मुलीला बोलते करून सुगावा मिळवला आणि आरोपीला अटक केली. मीरा रोड येथे २५ लाखांच्या घरफोडी प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी अब्दुल चिरा (४६) या आरोपीला अटक केली. तुळिंज पोलिसांनी नायजेरियन नागरिकाला पकडून ३१ लाखांचे अमली पदार्थ जप्त केले. त्याबद्दल विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, काशिमीराचे संदीप कदम तसेच तुळिंजचे शैलेंद्र नगरकर यांना मार्च महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला.

Scanned with CamScanner

दि.13/04/2023

सामना पान क्र.7

# वसई तालुक्यात शेकडो महिलांचा शिवसेनेत प्रवेश

**शिवगर्जना कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद**

वसई, दि. १२ (सा.वा.) – वसई तालुक्यातील मनसेच्या महिला पदाधिकाऱ्यांसह शेकडो महिलांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. सर्वांच्या हाती शिवबंधन बांधून आणि भगवा झेंडा देऊन पक्षात स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित शिवगर्जना कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



जिल्हा संघटक किरण चेंदवणकर यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा संपर्क संघटक भारती गावकर यांच्या उपस्थितीत मेळावा झाला. शिवगर्जना कार्यक्रमांतर्गत महिलांना शिवसेनेच्या वतीने सवलतीच्या दरात प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासाठी युनिक्स कॉम्प्युटरचे अशोक पाटील, पूजा चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उपजिल्हा संघटक भारती गावडे, तालुका संघटक प्रभा सुर्वे, अँजेला तांडेल, उपतालुका संघटक अनिता राणे, विधानसभा समन्वयक नयना वर्तक, शहर संघटक जसिंथा फिलंच, संगीता भोईर, शहरप्रमुख प्रथमेश राऊत तसेच महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या. यावेळी वसई विधानसभेतील पदाधिकाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपतालुका संघटक – सविता घरत. उपशहर संघटक – अश्विनी नाईक, अक्साना शेख, मालती जाधव, प्रणाली दरडे. विभाग संघटक – कल्पना नाडकर्णी, मंजिरी नाईक, प्राजक्ता जाधव, अन्नू गौड, राजश्री म्हात्रे, स्नेहल महाडिक, सीमा म्हात्रे, मनीषा नाईक, संजोनी घरत, गीता भिलाडे, जयश्री चोथवे. उपविभाग संघटक – हेमा वरठा, सोनाली मेहेर. शाखा संघटक – हेमाली सोनार, नेहा मेहेर, रुपाली नाईक, कल्पना भोईर, तृप्ती चौधरी, नयना उभाळे, योगिता मुद्या, सविता देवरे, माधवी पाटील, प्रिय गोघभरे. उपशाखा संघटक – राखी भोईर, प्रमिला घरत, करिश्मा घरत, सेंड्रा परेरा, सविता गवसकर.

## घरफोडी

**विरार :** पाचपायरी येथील गोविंद अपार्टमेंटमध्ये राहणारे दत्ताराम शिर्के यांच्या घराच्या किचनमधील खिडकीची ग्रील कापून चोरट्यांनी आत प्रवेश केला. कपाटातील सोन्याचे कानातले, नथ असा १८ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी शिर्के यांच्या तक्रारीवरून विरार पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कामगाराचा मृत्यू

**नालासोपारा :** गाळ्याचे काम करण्यासाठी पत्र्यावर चढल्यानंतर कामगाराचा पाय घसरून खाली पडल्याने मृत्यू झाल्याची घटना नालासोपारात घडली आहे. रामधिरज चव्हाण असे मृत कामगाराचे नाव आहे. उमर कंपाऊंड येथे अकबर खान यांच्या गाळ्याचे पत्राचे काम सुरू होते. हे काम रामधिरज करत असताना त्याचा तोल गेला आणि तो खाली कोसळला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

लोकमत पान क्र.4

# खानिवडेत रेती चोरीचा गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** खानिवडे येथे रेतीचोरीप्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ या खानिवडे ब्रिजखाली रेती उत्खननास बंदी असताना आरोपी एकनाथ वासुदेव घरत यानी मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास टाटा टेम्पोमध्ये दोन ब्रास रेती सिद्धेश उर्फ सिद्धू कांबळे याला विक्री करण्यासाठी घेऊन चालला होता. पोलिसांनी कारवाई करत दोन ब्रास रेती व टेम्पो असा ५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

दरम्यान, रेतीचोरीच्या अनेक घटना सातत्याने घडत आहेत. रेती उत्खनाला बंदी असतानाही मोठ्या प्रमाणावर रेती उत्खनन करून नेली जात आहे. परीणामी पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याचेही चित्र आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन याप्रकरणी ठोस कारवाई करण्याची मागणी होत आहे.

लोकमत पु. पान क्र.3

# असामाजिक तत्त्वांमुळे सलोखा धोक्यात : हुसेन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** गेल्या काही वर्षांत असामाजिक तत्त्वे राजकारणात येऊन सलोखा बिघडवून तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे जातीय-सामाजिक सलोखा राखण्याची जबाबदारी राजकारण्यांसह नागरिकांवर आली आहे, अशी भूमिका काँग्रेसचे नेते व माजी आमदार मुझफ्फर हुसेन यांनी मांडली.

शहरातील आगरी समाजाच्या रोहिदास पाटील, नरेंद्र पाटील, अशोक पाटील, लीलो पाटील, विकास म्हात्रे, एकनाथ पाटील, धनेश्वर पाटील आदी प्रमुखांनी मंगळवारी सायंकाळी मुझफ्फर यांची भेट घेतली. आगरी भवन उभारण्यासाठी ५ लाख ५५ हजारांची देणगी हुसेन यांनी दिली. यावेळी आगरी समाजाच्या प्रमुखांसोबत शहरात निर्माण केल्या जाणाऱ्या तेढ- तणावाबाबत चर्चा झाली. जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, माजी गटनेते जुबेर इनामदार, प्रवक्ते प्रकाश नागणे, राकेश राजपुरोहित, हेमंत मेहता आदी उपस्थित होते.

मात्र, गेल्या काही वर्षांत काही असामाजिक तत्त्व राजकारणात आले असून, त्यांनी मतांसाठी जाणीवपूर्वक धर्मवाद, प्रांतवाद, जातिवाद चालवला आहे. नागरिकांमधील सामाजिक, जातीय सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न सातत्याने त्यांच्याकडून केला जात आहे. लोकांमध्ये तेढ निर्माण करून दंगल घडविण्याचे कारस्थान हाणून पाडण्यासाठी, शांतता राखण्यासाठी देशभक्त राजकारणी व नागरिकांवर मोठी जबाबदारी आली आहे, असे हुसेन म्हणाले.

Scanned with CamScanner

लोकमत पु. पान क्र. १ दि. 13/04/2023

# नालेसफाईत अडथळा ठरणाऱ्या बेकायदा घरांवर पालिकेची कारवाई

## भाईंदरमध्ये जमावाचा विरोध, पुरुषांसह महिलांचाही सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या बजरंग नगर या सरकारी जमिनीवर वसलेल्या बेकायदा वस्तीतील नालेसफाईसाठी पोकलेन जात नसल्याने अडथळा ठरत असलेली चार घरे पालिकेने बुधवारी, १२ एप्रिलला तोडली. यावेळी कारवाईला विरोध करण्यासाठी मोठ्या संख्येने जमाव जमला असता तणाव पाहून पोलिसांनी माजी नगरसेवकास ताब्यात घेतले.



पालिकेने नालेसफाईसाठी पोकलेन व वाहने जाण्यासाठी मार्ग करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी बुधवारी आयुक्त दिलीप ढोले यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त मारुती गायकवाड, अतिक्रमण विभाग प्रमुख नरेंद्र चव्हाण, प्रभाग अधिकारी जितेंद्र कांबळे, सचिन बच्छाव, योगेश गुणीजन, वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुटलाल पाटील, पोलिस निरीक्षक माणिक पाटील आदींच्या उपस्थितीत पोलिस व महाराष्ट्र सुरक्षा बल जवानांच्या बंदोबस्तात कारवाईला सुरुवात करण्यात आली.

कारवाईला विरोध करण्यासाठी स्थानिक महिला व पुरुष मोठ्या संख्येने जमले तर माजी भाजप नगरसेवक अशोक तिवारी, पंकज पांडेय आदीही पुढे सरसावले. पोलिसांनी लोकांचा विरोध मोडून काढत तिवारी यांना पकडून भाईंदर पोलिस ठाण्यात नेले. त्यांना दुपारी उशिरा सोडण्यात आले.

घरे तोडण्याआधी कोणतीच पूर्वकल्पना पालिकेने दिली नाही, रहिवाशांचे मोठे नुकसान झाल्याने त्यांची भरपाई पालिकेने दिली पाहिजे, अन्यथा तक्रार करणार असल्याचे अशोक तिवारी यांनी सांगितले.

# ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांचा छापा

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेला रेल्वे स्थानकासमोर असलेल्या रूपेश ऑर्केस्ट्रा बारमध्ये बेकायदा अश्लील नाच सुरू असल्याप्रकरणी पोलिसांनी छापा मारून गुन्हा दाखल करीत सात जणांना ताब्यात घेतले. ऑर्केस्ट्रा बारमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली रूपेश बारचे चालक-मालक आणि कर्मचारी महिलांकडून अश्लील नृत्य करवून घेत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष भाईंदरचे पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळाली. अहिरराव यांनी मंगळवारी मध्यरात्री पोलिस पथकासह रूपेश बारवर छापा मारला. बारमधील कर्मचारी, वादक आदी सात जणांना पकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ९० हजारांचा मोबाइल चोरला

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला मॅक्सस मॉलजवळ रमणीकलाल गडा यांचे मोबाइलचे दुकान आहे. दुकानात काम करणारा चिंतन साईया व अन्य कर्मचारी १ एप्रिल रोजी सायंकाळी कामात असताना मोबाइल खरेदीच्या बहाण्याने एक व्यक्ती आला. त्याने डेमोसाठी ठेवलेला महागडा ९० हजार किमतीचा मोबाइल कर्मचाऱ्यांची नजर चुकवून पळविला. याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# गाडीची चावी मागितल्याने आईसह भावाला मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुलीला गाडीसाठी दिलेले पैसे मागण्यास आई गेली असता मुलीने नवऱ्यासोबत मिळून आईला व भावास शिवीगाळ, मारहाण केल्याची घटना भाईंदरमध्ये घडली.

भाईंदर पश्चिमेच्या भोलानगरमध्ये जानकी गुप्ता (वय ५०) ह्या कुटुंबासह राहतात. त्यांची मुलगी रूपा (२५) हिने आंतरजातीय विवाह केल्याने गुप्ता कुटुंबाचे तिच्याशी बोलणे बंद झाले. रूपा देखील भोलानगर भागातच राहते. जानकी यांनी तीन वर्षांपूर्वी रूपा हिला गाडी घेण्यासाठी २० हजार रुपये दिले होते. याबाबत रिक्षाचालक मुलगा अलोक (३२) याला समजल्यावर तो आईला सोबत घेऊन रूपाच्या घरी ८ एप्रिलच्या रात्री ११ वाजण्याच्या सुमारास पैसे मागण्यास गेला. त्यावेळी रूपा व तिचा नवरा रामबाबू वर्मा यांनी पैसे देण्यास नकार दिला. पैसे देत नाही, असे सांगितल्यावर अलोक याने गाडीची चावी मागितली असता त्यावरून वादावादी सुरू झाली. रामबाबू याने अलोकच्या डोक्यात बांबू मारला. त्यांच्यासोबत असलेल्या अनोळखी व्यक्तीने अलोक व जानकी यांना धक्काबुक्की, शिवीगाळ व दमदाटी केली. जानकी ह्या मुलास सोडवण्यासाठी गेल्या असता झटापटीत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र पडून गहाळ झाले. याप्रकरणी १ एप्रिल रोजी भाईंदर पोलिसांनी रूपा, रामबाबूविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

म.टा. पु. पान क्र. १

दि. 13/04/2023

# वाहने उदंड जाहली !

## कोंडी वाढूनही वसई-विरारमध्ये ७४ हजार वाहनांची भर

**वैष्णवी राऊत, वसई**


वसई-विरार शहरात वाहतूककोंडीची समस्या अधिकच जटील होत असतानाच, मागील आर्थिक वर्षात शहरात ७४ हजार ६११ नवीन वाहनांची भर पडल्याचे समोर आले आहे. मात्र दुसरीकडे, अरुंद रस्ते, बेवारस वाहने आणि फेरीवाल्यांचे अतिक्रमण या सर्वांचा परिणाम वाहतुकीवर होत आहे. त्यामुळे ही समस्या सोडवण्याचे मोठे आव्हान पालिकेपुढे आहे.

नुकत्याच संपलेल्या २०२२-२३ या आर्थिक वर्षात वसई-विरार शहरात मागील दोन वर्षांच्या तुलनेत दीडपट वाहने नव्याने रस्त्यावर उतरल्याचे समोर आले आहे. विरार येथील उपप्रादेशिक परिवहन विभागाकडे झालेल्या नोंदीनुसार, वसईत २०२२-२३ या वर्षात तब्बल ७४ हजार ६११ वाहनांची नोंदणी झाली. त्याआधी, २०२१-२२मध्ये ५५ हजार ८७६, तर २०२०-२१मध्ये ५४ हजार ४९७ वाहनांची नोंदणी झाल्याचे समोर आले आहे. म्हणजेच मागील तीन वर्षांत पावणेदोन लाख वाहनांची भर पडली आहे.

मात्र वाहने उभी करण्यासाठी पुरेशी जागा अजूनही वसई-विरारमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे अनेकजण रस्त्यातच वाहने उभी करतात. दुसरीकडे अनेक गॅरेजचालक तसेच दुकानदारांनी, फेरीवाल्यांनी रस्त्यावर अतिक्रमण करून आपली दुकाने थाटली आहेत. यामुळे रस्ते आक्रसले आहेत. परिणामी वाहतूककोंडीची समस्या तीव्र होत असून नागरिक हैराण झाले आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी पालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. टप्प्याटप्प्याने या उपाययोजना करण्यात येणार असल्याचे पालिकेने सांगितले.

कोंडी फोडण्यासाठी शहरात उड्डाणपूल प्रस्तावित असून त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. दुसरीकडे वाहतूक आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे पालिकेने लवकरात लवकर या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### वर्षानुसार वाहनांची नोंदणी




- अरुंद रस्ते, फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाची डोकेदुखी कायम
- वाहतूककोंडी फोडण्याचे पालिकेपुढे आव्हान



### फेरीवाल्यांवर कारवाई आवश्यक

वसई-विरार महानगरपालिका हद्दीत सध्या पदपथ तसेच रस्ते फेरीवाल्यांनी अडवले आहेत. त्यामुळे वाहतूककोंडी होत असते. यासाठी पालिकेने फेरीवाल्यांवर कारवाईचे सत्र हाती घेतले आहे. मात्र एका दिवशी कारवाई झाल्यानंतर, दुसऱ्या दिवशी पुन्हा हे फेरीवाले त्याच ठिकाणी येऊन बस्तान मांडतात. त्यामुळे पालिकेने लवकरात लवकर फेरीवाला धोरण निश्चित करून कार्यवाही करणे गरजेचे असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## दुचाकीचोर अटकेत

**मिरा-भाईंदर :** भाईंदरच्या नवघर पोलिसांनी दोन सराइत दुचाकी चोरांना अटक केली आहे. या आरोपीकडे सुमारे दीड लाख रुपये किमतीच्या चोरीच्या पाच दुचाकी पोलिसांना आढळल्या आहेत.

भाईंदर पूर्वेच्या नवघर परिसरात राहणाऱ्या रामलाल गुप्ता यांनी ६ एप्रिल रोजी त्यांची दुचाकी जेसल पार्क परिसरात उभी केली होती. ही दुचाकी दुसऱ्या दिवशी चोरीला गेल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली होती. या प्रकरणाची त्यांनी जवळच्या नवघर पोलिस ठाण्यात तक्रार केल्यानंतर, अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यापूर्वीदेखील दुचाकीचोरीच्या अनेक घटना परिसरात घडल्याने पोलिसांनी जलद तपास सुरू केला होता. यावेळी तांत्रिक व गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीआधारे मुंबईतील दहिसरमधून शुभम सिंग व ओम सोळंकी या दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी वाहनचोरीच्या प्रकरणाची कबुली दिली. त्यांनी भाईंदरमध्ये इतरही काही वाहनांची चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहेत. या दोघांकडून पाच दुचाकी वाहने जप्त करण्यात आली असून चार गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे.

पुण्यनगरी पु. पान क्र.५

# राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्षपदी अन्नू पाटील

**। मीरा रोड ।** मीरा-भाईंदर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष सुप्रिया माईनकर यांच्या जागी अनु पाटील यांची महिला जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्ती पत्र देण्यात आले. अन्नू पाटील या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला सरचिटणीस पदावर गेल्या एक महिन्यापासून कार्यरत होत्या. त्यांच्यावर आगामी पालिका निवडणुकांच्या तोंडावर मीरा-भाईंदरच्या शहर महिला जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.त्यांना नियुक्ती झाल्याबाबतचे पत्र सोमवारी देण्यात आले. अनु पाटील या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्यापूर्वी मनसेमध्ये पदाधिकारी होत्या. मनसेमध्ये असतानादेखील चांगले काम केले होते. त्यामुळेच त्यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांना प्रदेश कमिटीमध्ये घेण्यात आले होते. आता आगामी काळात महापालिका निवडणुका असल्यामुळे त्यांची महिला जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याचे सांगितले जात आहे. तर दुसरीकडे मीरा-भाईंदर शहर राष्ट्रवादी विद्यार्थी युवक जिल्हाध्यक्ष पदावर कार्यरत असलेल्या सुनील धाकतोडे यांची पक्ष विरोधी कृत्य केल्याच्या कारणामुळे हकालपट्टी करण्यात आली आहे. तसे पत्र पक्षाकडून मंगळवारी जाहीर करण्यात आले.

Scanned with CamScanner

पुढारी पु. पान क्र. १

दि. 13/04/2023

# धोकादायक इमारतीचे प्लास्टर कोसळले

## सुदैवाने भाडेकरू बचावले; भाईंदर पश्चिमेतील घटना

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिमेच्या खाऊ गल्ली परिसरात असलेल्या एका चार मजली इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅटच्या बेडरूमचे प्लास्टर कोसळल्याची घटना सोमवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली. सुदैवाने या फ्लॅटमध्ये राहणारे भाडेकरू हॉलमध्ये टीव्ही पहात होते. त्यावेळी बेडरूममध्ये कोणीही नसल्याने कोणीही जखमी झाले नसल्याचे प्रभाग अधिकारी जितेंद्र कांबळे यांनी सांगितले.

या इमारतीचे नाव जय तिरुपती अपार्टमेंट असे असून अपघातग्रस्त फ्लॅट एका दाम्पत्याला भाडेतत्वावर देण्यात आला आहे. इमारतीतील सुमारे ४० टक्के फ्लॅट इमारतीचे बिल्डर व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे असल्याचे इमारतीतील रहिवाशांकडून सांगण्यात आले. ही इमारत धोकादायक झाली असून पालिकेने इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी सोसायटीला अनेकदा नोटिसा बजाविल्या असतानाही इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट अद्यापही करण्यात आलेले नाही. तसेच इमारतीतील बहुतांशी फ्लॅट बिल्डरच्या मालकीचे असल्याने इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी बिल्डर सहकार्य करीत नसल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे इमारतीतील लोकं जीव मुठीत घेऊन त्यात वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. अखेर १० एप्रिल रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास फ्लॅट क्रमांक १३ मधील बेडरूमचे प्लास्टर अचानक कोसळले. यावेळी फ्लॅटमधील भाडेकरू हॉलमध्ये टीव्ही पहात होते. त्यामुळे सुदैवाने ते बचावले.



### स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबतची नोटीस

घटनेची माहिती मिळताच प्रभाग अधिकाऱ्यांनी तेथे धाव घेत पुन्हा सोसायटीला इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबतची नोटीस बजाविल्याचे सांगण्यात आले. मात्र पालिकेने कोणाच्याही दबावाखाली न येता या इमारतीचे सक्तीने येत्या पावसाळ्यापूर्वी स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण करावे. ऑडिट रिपोर्टमध्ये इमारत वास्तव्यास सक्षम नसल्यास ती तात्काळ रिकामी करून जमीनदोस्त करण्यात यावी. जेणेकरून संभाव्य अपघात टळेल, अशी अपेक्षा इमारतीतील रहिवाशांनी व्यक्त केली असून ऑडिट न करताच इमारत जैसे थे ठेवल्यास पावसाळ्यात ती अपघातग्रस्त झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न रहिवाशांनी उपस्थित केला आहे.

# विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन

**मिरारोड :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांचे अनुषंगाने जनजागृती व्हावी यासाठी वेदांत इंटरनॅशनल स्कुल, ज्युनियर कॉलेज व सायबर गुन्हे कक्ष, मिरा भाईंदर वसई विरार यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक मंगळवारी वेदांत इंटरनॅशनल स्कूल व ज्युनीयर कॉलेज येथे विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या विद्यार्थी संवाद मेळाव्यामध्ये विद्यार्थी यांना दैनदीन सोशल मिडीया वापराबाबत व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज, त्यांचे प्रश्नांचे निरसन करण्यात आले. या विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचे उपस्थितीत पार पडला. या संवाद मेळाव्यासाठी वेदांत इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्य सुजाता जाधव यांच्यासह १५ शिक्षक व आठवी, नववी, दहावीचे एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

पुढारी पान क्र. ५

# पैशाचा पाऊस पाडण्यासाठी घोडबंदर स्मशानात अघोरी प्रकार

## विरोध करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यावरच केला जादूटोण्याचा प्रयत्न

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील घोडबंदर स्मशानभूमीत दोन दिवसांपूर्वी दोन अज्ञात व्यक्तींनी एका मांत्रिकाच्या मदतीने पैशाचा पाऊस पाडण्यासाठी अघोरी प्रकार केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्याला विरोध करणाऱ्या स्मशानातील एका कंत्राटी कामगारावरच त्यांनी जादूटोणा करण्याचा प्रयत्न केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. घटनेची माहिती मिळताच पालिकेने काशिमीरा पोलीस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यासाठी पत्र दिले आहे.

राज्यात जादूटोणा, अघोरी कृत्याविरोधात कायदा तयार करण्यात आला असतानाही असे प्रकार कायद्यातील मवाळ तरतुदींमुळे सर्रास केले जात असल्याचे सतत समोर येत आहेत. असा प्रकार दस्तुरखुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर देखील करण्यात आल्याचे गेल्या निवडणुकीच्या काळात उघडकीस आला होता. अशा प्रकारामध्ये सध्या पैशाचा पाऊस पाडण्याचे फॅड मोठ्याप्रमाणात निरक्षर तसेच काही साक्षर पण बेरोजगार असलेल्या लोकांच्या मनात रुजू लागल्याचे दिसून येत आहे. अंगावर शहारे आणणारा असाच प्रकार मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील घोडबंदर स्मशानभूमीत दोन दिवसांपूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास घडला.

दोन अज्ञात व्यक्तींनी बाहेरून एका मांत्रिकाला घोडबंदर स्मशानभूमीत अघोरी प्रकार करण्यासाठी आणले होते. सुरुवातीला या तिघांनी परिसरातीलच एका अज्ञात ठिकाणी अघोरी प्रकार करून तेथील साहित्य घोडबंदर स्मशानभूमीत आणले होते. त्यांचा हा प्रकार सुरु असतानाच स्मशानावरील लोखंडी पत्र्यांचा त्यावर दगड मारल्याप्रमाणे आवाज सुरु झाला. त्याचा आवाज परिसरातील लोकांना येताच त्यांनी त्याची माहिती स्मशानात रात्रपाळीत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना दिली. कामगारांनी तेथे धाव घेऊन त्या तिघांना स्मशानात अघोरी प्रकार करण्यास विरोध केला. या कामगारांपैकी एका कामगाराने त्याला तीव्र विरोध केला असता त्याचा राग येऊन त्या मांत्रिकाने दोन अज्ञात व्यक्तीच्या मदतीने त्या कामगारावर जादूटोणा करण्याचा प्रयत्न केला. याची माहिती कामगारांनी प्रशासनाला दिली असता सार्वजनिक बांधकाम विभागाने पालिकेच्या स्मशानात अघोरी प्रकार केल्याविरोधात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यासाठी काशिमीरा पोलीस ठाण्यात अर्ज दाखल केला आहे. याची अधिक माहिती घेतली असता ते तिथे पैशाचा पाऊस पाडण्यासाठीच असा प्रकार करीत होते, असे सांगण्यात आले.

Scanned with CamScanner

# मुंबई- अहमदाबाद महामार्ग बनलाय मृत्यूचा सापळा

## दहिसर टोलनाका - शिरसाड हद्दीत सर्वाधिक अपघात; तीन महिन्यांत २० बळी

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

दिवसागणिक वाढत्या अपघातांमुळे मुंबई- अहमदाबाद महामार्ग पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. दहिसर टोलनाका ते शिरसाड दरम्यानच्या हद्दीत गेल्या तीन महिन्यांत सर्वाधिक अपघात घडले असून सुमारे २० नागरिकांचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. एकंदरीतच हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ अधिक प्रमाणात वाढली आहे. पहाटे तसेच रात्रीच्या सुमारास महामार्गाच्या दुरवस्थेमुळे मोठ्या प्रमाणावर अपघात घडले आहेत. मागील दोन वर्षांपासून महामार्गावर अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. अतिवेगाने वाहने चालविणे, वाहनांवरील नियंत्रण सुटणे, बंद वाहनांना धडका लागणे, काही भागांत रस्त्याची झालेली लेन कटिंग, अपुरे दुभाजक, पथदिव्यांचा अभाव अशा बाबी अपघातांना निमंत्रण देत आहेत.

दहिसर टोलनाका ते शिरसाड या दरम्यान तीन महिन्यांतच २० जणांचा अपघातात मृत्यू झाला आहे. तर १८ प्रवासी जखमी व पाच प्रवासी हे गंभीर जखमी झाले असल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे. याआधीच्या वर्षांत संपूर्ण वर्षभरात सरासरी १८ जणांचा अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण होते.



> महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी रस्ते सुरक्षा अभियान राबवत आहोत. वाहनचालकांनीही नियमांचे पालन करून वाहने चालवावीत.
>
> **-विठ्ठल चिंतामण,**
> पोलीस उपनिरीक्षक, महामार्ग वाहतूक, चिंचोटी

### उड्डाणपुलांवर पथदिव्यांची वानवा...

महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी प्राधिकरणाकडून वर्षभरापासून रमलर लावणे, रस्ते दुरुस्ती, सूचना फलक लावणे अशा उपाययोजना आखल्या जात आहेत. मात्र त्या सुद्धा उपाययोजना अपुऱ्याच आहेत. अजूनही बहुतांश उड्डाणपूल हे पथदिव्यांचा अभाव आहे. त्यामुळे रात्रीच्या सुमारास वाहनचालकांना अडचणी येतात तर दुसरीकडे जे सेवा रस्ते आहेत ते कचरा व राडारोडा याने भरलेले आहेत. त्यामुळे विश्रांतीसाठीची वाहने सुद्धा मुख्य रस्त्यावर उभी केली जात आहेत. विशेष म्हणजे मोकाट गुरे रात्रीच्या सुमारास महामार्गावर बसलेली असतात, ती वाहनचालकांना दिसत नाहीत. तसेच बिघाड झालेली अवजड वाहने रस्त्यातच उभी असल्याने मागून येणाऱ्या वाहनांची धडक बसून अपघात घडत आहेत. महामार्ग प्रशासनाने उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.

Scanned with CamScanner

# To catch a thief...

Sleuths of the MBVV police go undercover in a locality as fruit sellers, eatery owners and an autorickshaw driver to conduct a recce, and when they find the robber, they lift him onto their shoulders and carry him across railway tracks

DIWAKAR SHARMA
diwakar.sharma@mid-day.com

SLEUTHS of the crime branch of Mira Bhayandar Vasai Virar (MBVV) police went to great lengths to nab a chain snatcher recently at Ambivali in Thane district. They mixed up in the community as fruit sellers, eatery owners, an autorickshaw driver, and did not shave and bathe for weeks, wore tattered slippers and soiled clothes, just to conduct recce for 15 days in the area. Once they managed to catch hold of 24-year-old Abbas Amjad Irani, the cops literally carried him on their shoulders for over 500-metres to avoid locals attacking them, and then crossed railway tracks to arrest him.

A source in Crime Branch unit-2 told mid-day that Irani was involved in chain snatching cases registered at Manikpur police station last February. The police went to Ambivali to arrest him but his gang-members alerted the whole community. The cops returned empty handed.

The police then thought hard to outsmart him in his den, where the Irani community has a history of stone-pelting at cops if they arrive to arrest a chain snatcher.

After five visits to Ambivali, the cops found a hotel where Irani always dined, and crime branch sleuths got hold of him on April 3.

"Two of our officers tried to stop his motorcycle when he arrived, and he fell. Two more of our officers nearby joined. The four officers then lifted Irani and crossed the railway tracks, walking across 500 mtrs and bundled him into an autorickshaw. It was driven to a police vehicle and we brought him to Vasai for further investigation," said Inspector Sahuraj Ranaware, in-charge of Crime Branch unit-2.

**The police went to Ambivali to arrest him but his gang-members alerted the whole community. The cops returned empty handed**

The crime branch sleuths had even rumours that someone was killed. By the time the Irani gang members learnt that no murder had taken place, the police had crossed with Irani, half way to Vasai.

DCP (Crime Branch) Avinash Ambure, said, "Irani is involved in seven cases of chain snatching incidents in Vasai Virar-Nalasopara. He is also accused in 21 cases registered in Mumbai and Thane district. There are two MCOCA cases against him."

Ranaware added that Irani was trained by his father and uncle, who are also in police custody. He said in Delhi more than 100 chain snatching cases are registered against Irani.



Abbas Amjad Irani has cases against him in Delhi as well. PIC/HANIF PATEL







***'Irani is involved in seven cases of chain snatching incidents in Vasai Virar-Nalasopara. He is also accused in 21 cases registered in Mumbai and Thane district. There are two MCOCA cases against him'***

Avinash Ambure, DCP (Crime Branch)













1 Crime branch officers mix up amid locals as a rickshaw driver, fruit sellers, buyers etc. doing recce to nab their target, chain-snatcher 24-year-old Abbas Amjad Irani in Ambivali, Thane

2 Irani arrives on his bike to dine at a hotel and two cops grab him, but he falls

3 Two more cops nearby join them and they overpower him. The four quickly carry him on their shoulders

4 They walk with him from Vasai West to Vasai East across railway tracks towards a waiting rickshaw

5 He is put into the rickshaw driven by a crime branch officer and ferried towards a waiting police vehicle

6 They put him into the police vehicle and take him to crime branch unit-2 office at Vasai

ILLUSTRATIONS: UDAY MOHITE

Scanned with CamScanner

दैनिक आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
Post-Reg-No. PLG/158/2022-2024

# चेन स्नॅचर पकडला

## ३ लाखांहून अधिक किमतीचा माल जप्त

**वसई.** चोरीचे मोठे गूढ उकलण्यात गुन्हे शाखा २ वसई युनिटला यश आले आहे. वास्तविक, हे युनिट एमबीव्हीव्ही पोलिस आयुक्तालयांतर्गत कार्यरत असून, ते गुन्हेगारांना पकडण्याचे काम करते. याच क्रमाने गुन्हे शाखा २ च्या पथकाने २४ वर्षीय चेन स्नॅचरला आंबिवली येथून जेरबंद केले. त्याच्या अटकेने ७ गुन्हे उघडकीस आले आहेत. आणि तीन लाखांहून अधिक किमतीचा माल जप्त करण्यात आला. डीसीपी (गुन्हे) अविनाश अंबुरे आणि एसीपी अमोल



मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली क्राईम युनिट २ (पीआय) शाहूराज रणवरे आणि एपीआय सुहास कांबळे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने बुधवारी दिली. पोलिसांनी सांगितले की, १० फेब्रुवारी २०२३ रोजी फिर्यादी किरण अशोक मागिया (६२) यांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती की, सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास माणिकपूर नाका वसई पश्चिम येथून मोटारसायकलवरून आलेल्या चेन स्नॅचरने त्यांच्या अंगावरील सोनसाखळी खेचली. मान. फरार. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सुरू असलेल्या चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांना आळा घालण्याचे आदेश उच्च अधिकाऱ्यांनी दिल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले त्यानुसार प्रत्येक चेन स्नॅचिंगला गुन्हे शाखेच्या कक्ष- २ वसई येथे स्नॅचिंगच्या गुन्ह्याची घटनास्थळी भेट देण्यात आली व घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. चेन स्नॅचिंगच्या आरोपीच्या फुटेजनुसार गुप्त माहिती देणाऱ्या व्यक्तीच्या माध्यमातून आरोपीचे नाव समजले. आरोपी हा आंबिवली इराणी वस्ती येथील रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले पोलिसांनी सांगितले की, वरिष्ठांच्या आदेशाने व मार्गदर्शनावरून आंबिवली इराणी वस्ती येथील आरोपीच्या दिनक्रमाची माहिती मिळाली. यापूर्वीही अनेकांवर हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. इराणी वस्ती येथे आरोपींना पकडण्यासाठी गेलेल्या तपास पथकाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न न ठेवता सापळा रचून सर्व प्रकरणे व्यवस्थित मांडून ४ एप्रिल रोजी आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांनी सांगितले की, अब्बास अमजद इराणी (२४, रा. फातिमा मंजील, भास्कर शाळेसमोर, आंबिवली, पाटील नगर, कल्याण, जिल्हा- ठाणे) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अब्बासच्या अटकेने ७ गुन्हे (चेन स्नॅचिंग) उघडकीस आले आहेत. पोलिसांनी सांगितले की, अटक आरोपीची पार्श्वभूमी: अटक करण्यात आलेल्या आरोपीवर त्याच्यावर संघटित गुन्हेगारीच्या (मकोका) २ गुन्ह्यांसह जबरी चोरीचे २१ गुन्हे दाखल असून तो गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला लबाड गुन्हेगार आहे. तपासात चेन स्नॅचिंगचे गुन्हे आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. ७ प्रकरणे उघडकीस आली आहेत. चोरलेले ८७ ग्रॅम सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण ३ लाख ३१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

दैनिक आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक : ०२८ | गुरुवार १३ एप्रिल २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने : ०८

# MBVV सायबर क्राईम सेलचे नागरिकांना आवाहन, असे करू नका

**वसई.** आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापर खूप वेगाने वाढला आहे आणि त्याच प्रमाणात सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या मार्गांनी लोकांना फसवण्याचा प्रयत्न करतात. ज्याला सायबर सुरक्षेबद्दल माहिती आहे त्यांनी जरूर वाचावे. परंतु बहुतेक लोक सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात सहज अडकतात. सध्या घरी बसून त्यांना सोशल मीडियावर काही तासांत घरबसल्या काम करून पैसे कमवण्याची लिंक पाठवली जाते. त्याद्वारे वेबसाइटची लिंक उघडली जाते. त्यामध्ये तुमचे नाव नोंदवण्यास सांगून, सुरुवातीला पैसे पाठवून तुमची फसवणूक केली जाते. विश्वास संपादन केल्यानंतर कमिशनच्या नावाने पैसे पाठवण्याबरोबरच विविध कामांचे पुनरावलोकन, टॅगिंग, लाईक करून तुम्हाला रु. १०,०००/- मिळतील. मात्र त्यासाठी पॅकेज घेतल्यानंतर मोठ्या रकमेचे आमिष दाखवून तुमची फसवणूक केली जाते. सायबर क्राईम सेलने नागरिकांना आवाहन केले आहे की, (१) अनोळखी क्रमांकावरून आलेल्या एसएमएस लिंकवर क्लिक करू नका. (२) माहिती भरण्यापूर्वी , कृपया वेबसाइटची URL तपासा. (३) ने देखरेख केली आहे. बँक कार्ड तपशील, पिन, ओटीपी, पासवर्ड इत्यादी वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती कोणाशीही शेअर करू नका.(४).कोणत्याही लिंकवर क्लिक करण्यापूर्वी विचार करा.(५ .टेलिग्राममधील फसव्या लिंक्सवर क्लिक करू नका.(६).नामांकित कंपन्यांमध्ये घरून काम करून आमिष दाखवू नका. (Amazon, Flipkart, Job.com F.) तथापि, सायबर क्राईम सेल, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने मीरा-भाईंदर, वसई-विरार येथील नागरिकांना अशा फसवणुकीपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अशी कोणतीही ओळख फसवणूक झाल्यास, ताबडतोब जवळच्या पोलीस स्टेशन, सायबर क्राईम सेलशी संपर्क साधा. तसेच www.cybercrime.gov.in किंवा १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधा आणि तक्रार नोंदवा.

Scanned with CamScanner

# बोगस कॉल सेंटरचा मुख्य आरोपी फरार

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : राजोडी येथील फार्म हाऊसवरील बेकायदेशीर कॉल सेंटरचा अर्नाळा पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी पर्दाफाश केला. पण हे कॉल सेंटर चालवणारा मुख्य आरोपी नवीन भूपेंद्रकुमार भुटानी ऊर्फ सोनू ऊर्फ हर्षद तसेच रवी शेरसिंग व त्याचे इतर साथीदार, जागा मालक मयूर सुहास पाटोळे आणि इस्टेट एजंट प्रताप घेरमदास वलेचा आहेत. मागील दोन दिवसांपासून ते फरार असून, यांना पकडण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे आहे. ४१ आरोपींना १२ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे.

ओएली पेंट बॉल अरेना या फार्म हाऊसमध्ये कॉल सेंटर सुरू होते. या कॉल सेंटरमधून ऑस्ट्रेलियाच्या ग्राहकांचे कॉल्स वळवून आर्थिक फसवणूक होत होती. अर्नाळा पोलिसांनी ३६ तरुण, १० तरुणी, २ रिसॉर्टचालक यांना अटक केली.

## आपण रॅकेटचा भाग असल्याची अनेकांना नव्हती कल्पना

या कॉल सेंटरमध्ये काम करणारे तरुण-तरुणी दिल्ली, नोएडा, हरयाणातील आहेत. कॉल सेंटरच्या म्होरक्याने त्यांना १८ हजारांची नोकरी, राहण्याची सोय असे आमिष दाखवले. अनेकजण प्रथमच मुंबईत आले होते. आपण या रॅकेटचा भाग आहोत, याची कल्पना त्यांना नव्हती.

Hello Vasai
Page No. 1 Apr 12, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

## भरोसा कक्षाच्या तेजश्री शिंदे यांचा गौरव

# महिला पोलीस अधिकाऱ्याला सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** बागेश्वर बाबाच्या प्रवचनातील महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी, मतिमंद मुलीवरील बलात्कारातील आरोपीची अटक, १६ वर्षांपूर्वीच्या हत्येचा तपास आदींना पोलीस आयुक्तांतर्फे मार्च महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. यंदा प्रथमच महिला अधिकाऱ्याचा सन्मान झाला असून भरोसा कक्षाच्या तेजश्री शिंदे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

म्यानमार देशात फसवणूक करून डांबून ठेवलेल्या तरुणाची भरोसा कक्षाने भारतीय दूतावासाच्या मदतीने सुटका केली होती. त्याबद्दल भरोसा कक्षाच्या प्रमुख साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे यांना मार्च महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल आयुक्तांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### गुन्हे शाखेची सर्वोत्कृष्ट कामगिरी

गुन्हे शाखा २ च्या पथकाने सायकली चोरणाऱ्या टोळीला अटक करून १७ गुन्ह्यांची उकल केली होती. गुन्हे शाखा ३ च्या पथकाने २००७ मध्ये झालेल्या विनोद झा याच्या हत्येचा तपास करून १६ वर्षे फरार असलेल्या तीन आरोपींना अटक केली होती. याबद्दल गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी रणावरे तसेच गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांचा सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. बागेश्वर धाम बाबा यांच्या मीरा रोड येथील प्रवचनात १७ महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला गुन्हे शाखा १ आणि नवघर पोलिसांनी अटक केली होती. त्याबद्दल गुन्हे शाखा १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे आणि नवघरचे विजयसिंह बागल यांना पुरस्कार देण्यात आला.

### पोलिसांचा सन्मान

विरारमध्ये अल्पवयीन मतिमंद मुलीवरील बलात्कार प्रकरणात विरार पोलिसांनी संवाद कौशल्याच्या आधारे मुलीला बोलते करून सुगावा मिळवला आणि आरोपीला अटक केली. मीरा रोड येथे २५ लाखांच्या घरफोडी प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी अब्दुल चिरा (४६) या आरोपीला अटक केली. तुळिंज पोलिसांनी नायजेरियन नागरिकाला पकडून ३१ लाखांचे अमली पदार्थ जप्त केले. त्याबद्दल विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, काशिमीराचे संदीप कदम तसेच तुळिंजचे शैलेंद्र नगरकर यांना मार्च महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला.

लोकसत्ता
Thu, 13 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72165186

Scanned with CamScanner

# 'वर्क फ्रॉम होम' के नाम पर होने वाली धोखाधड़ी के संबंध में नागरिकों को सतर्कता बरतने के लिए आह्वान

वसई। आज के तकनीकी युग में इंटरनेट का उपयोग बहुत तेजी से बढ़ा है और उसी अनुपात में साइबर अपराधों की संख्या में भी वृद्धि हुई है। साइबर अपराधी अलग-अलग तरीकों से लोगों को ठगने की कोशिश करते हैं,जिस किसी को भी साइबर सुरक्षा के बारे में जानकारी है, उसे इसे पढ़ना चाहिए। लेकिन ज्यादातर लोग साइबर अपराधियों के जाल में आसानी से फंस जाते हैं, फि लहाल घर बैठे उन्हें सोशल मीडिया पर विज्ञापन पर कुछ ही घंटों में घर से काम करके पैसे कमाने का लिंक भेजा जाता है,उसके जरिए चैट बॉक्स खुल जाने के बाद वेबसाइट का लिंक भेजकर उसमें अपना नाम दर्ज कराने की बात कहकर शुरू में पैसे भेजकर विश्वास हासिल कर कमीशन के नाम पर पैसे भेजने की बात कहकर ठगी की जाती है,साथ ही विभिन्न कार्यों की समीक्षा, टैगिंग, पसंद करने पर आपको 10,000/- रुपये मिलेंगे। लेकिन उसके लिए पैकेज लेने के बाद मोटी रकम का लालच देकर आपको ठगा जाता है।साइबर क्राइम सेल नागरिकों से अपील करता है कि,(1).अनजान नंबरों से आए एसएमएस लिंक पर क्लिक न करें, (2).वेबसाइट पर अपनी गोपनीय जानकारी दर्ज करने से पहले,कृपया वेबसाइट के यू.आर.एल देखभाल करने वाले की जाँच करें,(3).व्यक्तिगत या वित्तीय जानकारी जैसे बैंक कार्ड का विवरण, पिन, ओटीपी, पासवर्ड आदि किसी के साथ साझा न करें,(4).किसी लिंक पर क्लिक करने से पहले सोचें,(5).टेलीग्राम में धोखाधड़ी वाले लिंक पर क्लिक न करें, (6).प्रतिष्ठित कंपनियों में घर से काम कर पैसा कमाने के लालच में न आएं। (अमेजॅन,फ्लिपकार्ट, जॉब डॉट कॉम आदि)हालांकि, साइबर क्राइम सेल, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय द्वारा मीरा-भाईंदर,वसई-विरार के नागरिकों से इस तरह की धोखाधड़ी के बारे में सतर्क रहने की अपील करता है।साथ ही इस तरह से किसी भी तरह की पहचान संबंधी धोखाधड़ी होने पर तुरंत नजदीकी पुलिस स्टेशन, साइबर क्राइम सेल से संपर्क करें।

Scanned with CamScanner

लोकमत



गुन्हे शाखा युनिट दोनच्या पोलिस अधिकारी आणि टीमने सोनसाखळी चोरी करणाऱ्या आरोपीला पकडून त्याच्याकडून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केला.

# सराईत सोनसाखळी चोरट्यास केली अटक

## ७ गुन्ह्यांची उकल; लाखोंचा माल हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गुन्हे शाखा युनिट दोनच्या पोलिस अधिकारी आणि त्यांच्या टीमने सोनसाखळी चोरी करणाऱ्या आरोपीला पकडले आहे. त्याच्याकडून ७ गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळाल्याची माहिती गुन्हे विभागाचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

वसईच्या बंगली रोडवरील रो हाऊस नंबर ५, शक्ती विलाज येथे राहणाऱ्या किरण अशोक मगिया (६२) या सुनेबरोबर दुचाकीवरून १० फेब्रुवारीला जैन मंदिर येथे कार्यक्रमासाठी पहाटे ६ वाजता जात होत्या. माणिकपूर नाका येथे समोरून दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातून सोन्याची चेन जबरीने खेचून ते पळून गेले. माणिकपूर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये सतत होणाऱ्या चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांना आळा घालण्याबाबत व घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी मार्गदर्शन व सूचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट दोनचे अधिकारी व अंमलदार यांनी घडणाऱ्या प्रत्येक चेन स्नॅचिंग गुन्ह्यांचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पाहिले होते. चेन स्नॅचिंग गुन्ह्यांतील आरोपीचे फुटेज परीक्षण व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या महितीच्या आधारे आरोपी अब्बास अमजद ईराणी (२४) हा आरोपी असल्याचे लक्षात आले. तो आंबिवली इराणी वस्तीतील रहिवासी आहे. यापूर्वी इराणी वस्तीत आरोपीस पकडण्यासाठी गेलेल्या तपास पथकावर हल्ला होण्याच्या बऱ्याच घटना घडलेल्या असल्याने काळजीपूर्वक सापळा रचून त्याला ४ एप्रिलला ताब्यात घेतले. अटक आरोपीकडून तपासादरम्यान चेन स्नॅचिंगचे ७ गुन्हे उघडकीस आणून चोरी करण्याकरीता वापरलेल्या दुचाकीसह गुन्ह्यात चोरीस गेलेले ८७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ३१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अटक आरोपीविरोधात संघटित गुन्हेगारीचे २ गुन्हे, जबरी चोरीसह दुखापतीचे २१ गंभीर गुन्हे ठाणे शहर पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दाखल आहेत.

### यांनी केली कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शाहुराज रणवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, सागर शिंदे, सहाय्यक फौजदार रमेश भोसले, मंगेश चव्हाण, संजय किसन नवले, पोलिस हवालदार चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, संतोष चव्हाण यांनी केली आहे.



Scanned with CamScanner

लोकमत

# 'भरोसा' देऊन वाद सोडविला, ९६५ जोडप्यांचा संसार सावरला

## वसईत कौटुंबिक न्यायालय नाही : भरोसा सेलद्वारे होतो प्रयत्न

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** कौटुंबिक व वैवाहिक वाद हे संवादातून मिटविण्यासाठी कौटुंबिक न्यायालयात 'लेट्स टॉक' म्हणजे 'चला बोलूया' ही योजना राबविली जात आहे. जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली या योजनेचे काम चालते. योजनेतून मदतीसाठी विधि साहाय्यता कक्षाकडे अर्ज करावा लागतो. परंतु, वसईत कौटुंबिक न्यायालय नसल्याने भरोसा सेलच्या कार्यालयातून सर्वच प्रकारचे वाद निकाली काढले जातात. पोलिस आयुक्तालयाअंतर्गत असलेल्या भरोसा सेलने मीरा भाईंदर, वसई आणि विरार परिसरातील ९६५ जोडप्यांचा समेट घडवून आणत त्यांचा संसार सुखी करण्याचा प्रयत्न केला.

पती-पत्नीमध्ये छोट्या-मोठ्या कारणांवरून वाद होतात. ते विकोपाला गेल्यानंतर पती- पत्नीमधील नाते तकलादू होते. एकमेकांवरील विश्वास कमी होतो, परिणामी हळूहळू संसार तुटतो. तो पुन्हा जोडण्यासाठी पती किंवा पत्नीकडून भरोसा सेलकडे अर्ज केल्यास मोफत समुपदेशन करून संसार जुळविण्यासाठी प्रयत्न होतात.



### काय आहे 'चला बोलूया' योजना?

पती-पत्नीमध्ये काही कारणांनी विसंवाद निर्माण होऊन संसार तुटत असेल तर तो पुन्हा जुळवण्यासाठी 'चला बोलूया' ही योजना सुरु आहे. वसईत कौटुंबिक न्यायालय नसल्याने ही प्रकरणे भरोसा सेलमधून मिटविली जातात.

### ९६५ जोडप्यांनी सावरला संसार

कौटुंबिक वैवाहिक वादातून दुरावलेली जोडपी महिन्याला भरोसा सेल कक्षाद्वारे करण्यात येत असलेल्या समुपदेशनाद्वारे एकत्र येतात. अशा प्रकारे आतापर्यंत भरोसा सेलकडे दाखल झालेल्या १५१८ तक्रारींपैकी ९६५ जोडप्यांचे मनोमिलन करण्यात आले आहे.

### मोबाइल अन् व्हॉटस्अॅप हेच सर्वात मोठे कारण

सुखी संसारात विष कालविण्याचे काम मोबाइल करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे नवरा-बायकोच्या नात्यामधील गोष्ट घटस्फोटापर्यंत जाऊन ठेपली आहे.

\- अधिकारी, भरोसा सेल

### वर्षभरात १,५१८ अर्ज दाखल




वसई, विरार भरोसा सेलमध्ये २०२२ ते ११ एप्रिल २०२३ या दरम्यान कौटुंबिक वादाचा निपटारा करण्यासाठी १,५१८ तक्रारी दाखल झाल्या आहेत. पती-पत्नीमधील अहंकार, मोबाइलमुळे उद्भवलेले वाद, अनैतिक संबंध, यामुळे अनेकांनी घटस्फोटासाठी न्यायालयात दावा दाखल केला आहे.

### तक्रारी काय येतात ?

**१ ज्येष्ठ म्हणतात, मुलं सांभाळत नाही :** आजघडीला कुटुंबातील वृद्धांना सन्मानजनक वागणूक मिळत नाही. ज्येष्ठ म्हणतात, मुलगा, सून सांभाळत नाही. कुटुंबातील ज्येष्ठांची तक्रार सून, मुलगा व्यवस्थित सांभाळत नाही, अशी असते.

**२ पती सतत संशय घेतो :** पती वारंवार संशय घेतो, अशी पत्नीची तक्रार असते. पत्नी वारंवार कटकट करते, अशी पतीची तक्रार असते. नात्यातील समजूतदारपणा कमी होत आहे. मोबाइलच्या अतिवापरामुळे दोघांच्या संसारात इतरांची ढवळाढवळ वाढली आहे.

**३ संसारात मोबाइल करतो घात :** काही घटस्फोटांची कारणे अतिशय क्षुल्लक अशी असतात. पत्नी जुमानत नाही, एकमेकांवर संशय घेणे, मोबाइलवर अधिक काळ रमणे, यावरूनही घटस्फोटासाठी दावे दाखल होतात.



Scanned with CamScanner